POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२३ ● मुंबई, गुरुवार, २५ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' अभियानाला नाशिकमध्ये बळ

के. के. वाघ महाविद्यालयात जनजागृती कार्यशाळा, राज्यस्तरीय उपक्रमांची घोषणा

आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टच्या पुढाकारातून थॅलेसेमिया, ॲनिमिया व पोषण जनजागृतीसाठी व्यापक अभियानाची सुरुवात



■नाशिक। प्रतिनिधी,

राज्यात 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' घडविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टच्या जनजागृती अभियानाला नाशिकमध्ये नवे बळ मिळाले आहे. **दिनांक २३ जून २०२६ रोजी के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र महाविद्यालय, सरस्वती नगर, नाशिक आणि आश्रय ट्रस्ट, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने** 'थॅलेसेमिया, ॲनिमिया आणि न्यूट्रिशन जनजागृती' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेत आश्रय ट्रस्टचे आरोग्य विभाग कार्यसचिव **प्रा. प्रकाश आर. पांगम** यांनी **थॅलेसेमिया व ॲनिमिया** या रक्तविकारांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणी, वेळेवर निदान आणि जनजागृती हेच या आजारांच्या प्रतिबंधासाठी प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी सांगितले. **''थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र''** हे केवळ अभियान नसून पुढील पिढीला निरोगी आयुष्य देण्यासाठीची सामाजिक



यावेळी के. के. वाघ संस्थेचे सरस्वती नगर संकुल समन्वयक व विश्वस्त **डॉ. विनायक सेवलिकर**, **प्राचार्य डॉ. पुंडलिक रसाळ**, **उपप्राचार्य डॉ. अनुराधा नांदुरकर**, विज्ञान विभाग प्रमुख **प्रा. अर्चना कोते**, **डॉ. वर्षा मिस्त्री**, **प्रा. दामिनी करसाळे** आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन **प्रा. संजना चव्हाण व प्रा. सुजाता टर्ले** यांनी केले.

जबाबदारी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. **आहारतज्ञ डॉ. सोनाली काठोळे** यांनी संतुलित आहार, पोषणमूल्ये आणि आरोग्यदायी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. थॅलेसेमिया व ॲनिमिया रुग्णांसाठी योग्य आहाराचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान ए. के. डायग्नोस्टिक लॅबचे **श्री. रवींद्र कुलकर्णी** व त्यांच्या तंत्रज्ञ पथकाने शिक्षक व कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली.

या कार्यशाळेच्या निमित्ताने आश्रय ट्रस्ट आणि के. के. वाघ संस्थेमध्ये आगामी शैक्षणिक वर्षात आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. विद्यार्थ्यांसाठी थॅलेसेमिया, ॲनिमिया व पोषण विषयक चर्चासत्रे, आरोग्य तपासणी शिबिरे तसेच राज्यस्तरीय मार्गदर्शन परिषद आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यभर 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' या अभियानाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टचे संस्थापक मार्गदर्शक स्व. डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' अभियानाला राज्यभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ यांना जोडून व्यापक जनजागृती चळवळ उभी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. के. के. वाघ महाविद्यालयातील हा उपक्रम त्या व्यापक सामाजिक अभियानाची प्रभावी सुरुवात ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. **''थॅलेसेमिया व ॲनिमियामुक्त महाराष्ट्र''** हे केवळ आरोग्य अभियान नसून निरोगी, सशक्त आणि जागरूक समाज घडविण्याची लोकचळवळ आहे. आश्रय ट्रस्ट व के. के. वाघ महाविद्यालयाचे संयुक्त प्रयत्न या सामाजिक परिवर्तनाला नवी दिशा देणारे ठरत आहेत.






के.के. वाघ महाविद्यालयात ७० शिक्षक-कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' अभियानाला नवी दिशा

आश्रय ट्रस्टच्या पुढाकारातून आरोग्य संवर्धन व थॅलेसेमिया-ॲनिमिया जनजागृतीचा दुहेरी उपक्रम



■नाशिक। प्रतिनिधी,

राज्यात ह्याथॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्रह्ण घडविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे आणि के.के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ जून २०२६ रोजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी **मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन** करण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत एकूण ७० शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तपासणीचा लाभ घेतला.शिबिरात सीबीसी (CBC) चाचणी मोफत करण्यात आली. तसेच थॅलेसेमिया, ॲनिमिया, रक्त तपासणी आणि इतर आवश्यक आरोग्य चाचण्या सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आल्या. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.





कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **आश्रय ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव प्रा. प्रकाश आर. पांगम** यांनी नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले. थॅलेसेमिया आणि ॲनिमियासारख्या आजारांचे वेळेत निदान झाल्यास त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. आरोग्यदायी समाज घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. **आहारतज्ञ डॉ. सोनल काठोळे** यांनी संतुलित आहार, योग्य पोषण आणि निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. ए. के. डायग्नोस्टिका लॅबोरेटरीचे **श्री. रविंद्र कुलकर्णी** तसेच शिवानी जाधव व अर्चना कुदेकर यांच्या पथकाने तपासणीचे काम पार पाडले. या प्रसंगी के.के. वाघ संस्थेचे सरस्वती नगर संकुल समन्वयक व **विश्वस्त डॉ. व्ही. एम. सेवलिकर**, **प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ**, उपप्राचार्य **डॉ. अनुराधा नांदुरकर**, कार्यक्रम समन्वयक व विज्ञान विभाग प्रमुख **प्रा. अर्चना कोते** यांच्यासह विविध विभागांचे मान्यवर उपस्थित होते.

आश्रय ट्रस्टतर्फे राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' अभियानाच्या अनुषंगाने शैक्षणिक संस्था, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची मालिका राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी के.के. वाघ संस्थेचे अध्यक्ष **मा. समीरदादा वाघ** यांचे विशेष सहकार्य लाभले.







संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

अस्थिरतेचे नवे आव्हान

मध्यपूर्वेतील इतिहासाने वारंवार दाखवून दिले आहे, की हिंसेतून टिकाऊ समाधान मिळत नाही. शस्त्रांपेक्षा संवाद, समन्वय आणि परस्पर आदर हाच शांततेचा मार्ग आहे. त्यासाठी प्रयत्न करणे ही आजची गरज आहे.

भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला लेबनॉन हा देश आकाराने लहान असला, तरी मध्यपूर्वेच्या राजकारणात त्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या काही दशकांपासून हा देश प्रादेशिक शक्तीसंघर्ष, धार्मिक ध्रुवीकरण, बाह्य हस्तक्षेप आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता यांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अशा परिस्थितीत लेबनॉनमध्ये पुन्हा वाढत असलेला तणाव आणि युद्धविरामाच्या प्रयत्नांबाबत निर्माण झालेली अनिश्चितता ही केवळ एका देशाची समस्या नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या भवितव्याशी संबंधित बाब आहे. हिज्बुल्लाहची भूमिका, इस्रायलची सुरक्षा धोरणे, इराणचा प्रभाव आणि अमेरिकेची मध्यस्थी यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. आज जग एका अशा टप्प्यावर उभे आहे, जिथे युद्धे केवळ रणांगणावर लढली जात नाहीत, तर राजनैतिक मंचांवर, आर्थिक धोरणांमध्ये आणि जनमताच्या पातळीवरही लढली जातात. लेबनॉनमधील परिस्थिती हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. संघषार्तील प्रत्येक पक्ष आपली भूमिका योग्य असल्याचा दावा करतो; परंतु या सर्व दाव्यांच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे या संघर्षाचा शेवट नेमका कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या मार्गाने होणार आहे? मध्यपूर्वेतील राजकारण समजून घेताना हिज्बुल्लाहकडे केवळ एका सशस्त्र संघटनेच्या रूपात पाहणे अपुरे ठरते. लेबनॉनच्या सामाजिक आणि राजकीय संरचनेत या संघटनेचे खोलवर अस्तित्व आहे. देशातील अनेक भागांमध्ये तिचा प्रभाव केवळ सुरक्षा विषयांपुरता मर्यादित नसून सामाजिक सेवा, राजकीय प्रतिनिधित्व आणि स्थानिक नेतृत्वाशीही जोडलेला आहे. त्यामुळे लेबनानमधील कोणतीही शांतता प्रक्रिया हिज्बुल्लाहला पूर्णपणे बाजूला ठेवून यशस्वी होईल, अशी अपेक्षा वास्तववादी वाटत नाही. शांततेसाठी नेहमीच संवाद आवश्यक असतो आणि संवादासाठी सर्व प्रभावी घटकांचा सहभाग आवश्यक असतो. दुसरीकडे, इस्रायलची भूमिकादेखील समजून घेणे आवश्यक आहे. इस्रायलने आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सीमावर्ती भागांमधून होणारे हल्ले, क्षेपणास्त्रांचा धोका आणि शत्रुत्वाची भावना यामुळे इस्रायल अनेकदा कठोर लष्करी कारवाया करतो. त्याच्या दृष्टीने या कारवाया राष्ट्रीय सुरक्षेचा भाग असतात; परंतु प्रत्येक लष्करी कारवाईचे परिणाम केवळ लक्ष्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर, पायाभूत सुविधांवर आणि समाजाच्या मानसिकतेवरही होतो. युद्ध जितके लांबते, तितकी द्वेषाची दरी खोल होत जाते. या संपूर्ण समीकरणात इराणची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव हा आजच्या मध्यपूर्वेतील सर्वात गंभीर भू-राजकीय प्रश्नांपैकी एक मानला जातो. लेबनॉनमधील संघषार्ला व्यापक प्रादेशिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले, तर त्याचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. अशा परिस्थितीत केवळ लेबनॉन किंवा इस्रायल नव्हे, तर संपूर्ण प्रदेश अस्थिरतेच्या गर्तेत जाऊ शकतो. यामुळे ऊर्जा बाजारपेठा, जागतिक व्यापार आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. अमेरिकेने अनेक दशकांपासून मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. काही प्रयत्न यशस्वी ठरले, तर काही अपयशी; मात्र इतिहास सांगतो, की स्थानिक घटक तयार असतात, तेव्हाच बाह्य शक्तींची मध्यस्थी प्रभावी ठरते. कोणत्याही संघषार्चा तोडगा बाहेरून लादता येत नाही. तो संबंधित समाजांनी आणि नेतृत्वाने स्वीकारला पाहिजे. अन्यथा करार कागदावर राहतात आणि वास्तवात संघर्ष कायम राहतो. लेबनॉनची अंतर्गत परिस्थितीही हे संकट अधिक गंभीर बनवते. गेल्या काही वर्षांमध्ये देशाने आर्थिक दिवाळखोरी, चलनवाढ, बेरोजगारी आणि राजकीय अनिश्चिततेचा सामना केला आहे. अनेक कुटुंबांचे जीवन आधीच संकटात सापडले आहे. अशा वेळी संघर्ष तीव्र झाल्यास सामान्य नागरिकांची परिस्थिती बिकट होऊ शकते. युद्धाचा सर्वात मोठा फटका युद्धाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्यांना बसतो. त्यांच्या घरांचे, रोजगाराचे, शिक्षणाचे आणि भविष्याचे नुकसान होते. युद्धाच्या बातम्यांमध्ये अनेकदा शस्त्रास्त्रे, रणनीती आणि राजकीय घोषणा यांवर भर दिला जातो; परंतु प्रत्येक संघषार्मागे मानवी वेदनांची एक मोठी कहाणी दडलेली असते. हजारो कुटुंबे विस्थापित होतात. मुलांचे शिक्षण खंडित होते. रुग्णालयांवर ताण वाढतो आणि संपूर्ण पिढी असुरक्षिततेच्या वातावरणात वाढते. त्यामुळे कोणत्याही संघषार्चे मूल्यांकन करताना मानवी हक्क आणि मानवी जीवन केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. आजची सर्वात मोठी गरज म्हणजे संयम आणि संवाद. संघषार्तील कोणताही पक्ष स्वतःला पूर्णपणे विजयी समजू शकत नाही. आधुनिक युद्धांमध्ये स्पष्ट विजयापेक्षा दीर्घकालीन नुकसान अधिक दिसून येते. आर्थिक संसाधने खर्ची पडतात, सामाजिक एकात्मता कमकुवत होते आणि भविष्यातील विकासाला मोठा धक्का बसतो. त्यामुळे युद्ध सुरू ठेवण्यापेक्षा संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरते. मध्यपूर्वेच्या इतिहासात अनेकदा तणाव नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली असली, तरी संवाद आणि राजनैतिक प्रयत्नांमुळे संघर्ष कमी झाल्याची उदाहरणेही आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.त्यामुळे लेबनॉनमधील सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीने पाहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय, प्रादेशिक शक्ती आणि स्थानिक नेतृत्व यांनी शांततेसाठी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजचा संघर्ष केवळ सीमावाद किंवा लष्करी कारवायांपुरता मर्यादित राहिलेला नाही; मध्यपूर्व हा प्रदेश गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष, राजकीय स्पर्धा, धार्मिक ध्रुवीकरण आणि जागतिक महासत्तांच्या हस्तक्षेपामुळे सतत अस्थिर राहिला आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, सीरिया युद्ध, इराण-सौदी अरेबिया स्पर्धा आणि विविध सशस्त्र संघटनांची उपस्थिती यामुळे या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न वारंवार अपुरे ठरले आहेत. अशा परिस्थितीत लेबनॉनमधील तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. हिज्बुल्लाहने युद्धविरामाच्या प्रस्तावाला विरोध दर्शवल्याची माहिती समोर येत असताना आणि इस्रायलने लष्करी कारवाया सुरू ठेवण्याची भूमिका घेतल्याने संपूर्ण प्रदेशातील स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धविराम हा संघर्षाचा अंतिम तोडगा नसला तरी शांततेकडे जाणारा पहिला महत्त्वाचा टप्पा असतो. तो नागरिकांना दिलासा देतो, मानवी मदत पोहोचवतो आणि चर्चेसाठी वातावरण तयार करतो. मात्र सर्व पक्ष सहभागी नसतील तर त्याचे यश अनिश्चित राहते. लेबनॉनमधील घडामोडी याचीच आठवण करून देतात.

मृग नक्षत्र लांबले, कोकण कोरडे पडले!



हिरवाई, पाऊस आणि निसर्गाच्या लयीसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोकणावर यंदा बदलत्या हवामानाची छाया गडद झाली. पावसाची प्रतीक्षा लांबत असताना शेतकरी, जलस्रोत आणि संपूर्ण ग्रामीण जीवनचक्र चिंतेत सापडले आहे. ऋतुचक्रातील बदलामुळे कोकणातील पावसाची पारंपरिक वेळ विस्कटत असून, आकाशाकडे लागलेल्या नजरा आता मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

ऋतुचक्रातील या अनिश्चिततेमुळे सारेच बदलून गेले आहे. पाऊस केव्हा सुरू होणार, याची प्रतीक्षा केवळ कोकणातील शेतकऱ्यांनाच नाही, तर पाण्याच्या स्रोतांनाही आहे. दिवसेंदिवस पाण्याचे साठे कमी होत असून, यंदा कोकणात अपेक्षित प्रमाणात पाऊस होईल की नाही, याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. एकीकडे पावसाची सुरुवात अद्याप लांबली आहे, तर दुसरीकडे त्यामुळे अनेक प्रश्नांची गुंतागुंत निर्माण झाली आहे. नेहमी हिरवाईने नटलेल्या कोकणावरही यंदा निसगार्ची अवकृपा झाल्याचे चित्र दिसत आहे. अनेक भागात दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे, तर काही ठिकाणी पेरलेला तरवा जगविण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धडपड सुरू आहे. बदलत्या हवामानाचा फटका शेतीला बसत असून, बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. कोकणात साधारणपणे ७ जूनला मृग नक्षत्राच्या आगमनासोबत पावसाची सुरुवात होते, अशी परंपरागत समजूत आहे.

त्याआधी मे महिन्यातच अवकाळी पावसाच्या रूपाने मान्सूनची चाहूल लागते. मे महिन्याच्या सुरुवातीच्या किंवा शेवटच्या पंधरवड्यात पाऊस हजेरी लावतो; मात्र त्यानंतर काही दिवसांची विश्रांती घेतो. आणि एकदा का ७ जूनच्या मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पावसाने जोर धरला की, कोकणात त्याची संततधार सुरू होते. कोकणातील पावसाची ही अनोखी सैर आणि निसगार्ची ही लय नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण राहिली आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत ऋतुचक्रात मोठे बदल जाणवत आहेत. पाऊस नेमका कधी येईल आणि कधी परतेल, याचा अंदाज बांधणे आता कठीण झाले आहे. यंदा तर उष्णतेने विक्रमी पातळी गाठली असून, प्रचंड उकाड्याने कोकण अक्षरशः होरपळून निघाले आहे. एप्रिल-मे महिन्यात जाणवणारी तीव्रता यंदा त्याही पुढे गेल्याचा अनुभव येत आहे. या वाढत्या तापमानाचा परिणाम कोकणातील जलस्रोतांवरही झाला आहे. ज्या काळात नद्या, नाले, ओहोळ पावसाच्या पाण्याने दुथडी भरून वाहायला हवेत, त्या काळात अनेक नदीपात्रे कोरडी पडलेली दिसत आहेत. पाण्याचे स्रोत आटल्याने ग्रामीण भागातही चिंता वाढली आहे. आता अवघे कोकण आकाशाकडे डोळे लावून बसले आहे. कधी एकदा पावसाच्या सरी बरसतात आणि निसर्ग पुन्हा हिरवाईने नटतो, याची आतुरतेने प्रतीक्षा सुरू आहे.

जूनच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित असलेला पाऊस अद्यापही कोकणात दाखल झालेला नाही. अधूनमधून काही भागांत पावसाच्या हलक्या सरी येत आहेत; मात्र त्यात अपेक्षित जोर नसल्याने त्या काही अंतरावरच विरून जात आहेत. वळवाच्या पावसासारखीच या सरींची अवस्था असून, त्याचा शेतकऱ्यांना फारसा फायदा होत नाही. त्यामुळे कोकणातील शेतकरी चिंतेत सापडला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये पारंपरिक भातशेती करणाऱ्यांची संख्या गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात घटली आहे. वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता आणि आर्थिकदृष्ट्या शेती परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी भातशेतीकडे पाठ फिरवली आहे. परिणामी अनेक ठिकाणी भातशेतीचे क्षेत्र कमी झाले असून शेतजमिनी पडिक राहण्याचे प्रमाण वाढले आहे. असे असले तरी कोकणातील अनेक गावांमध्ये आजही मोठ्या प्रमाणावर भात लागवड केली जाते. मे अखेरीस किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सुरू झाला की शेतकरी भात पेरणीला सुरुवात करतात. सुरुवातीचा चांगला पाऊस मिळाल्यास भाताची रोपेही जोमाने उगवतात. मात्र यावर्षी पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फेरले आहे. अनेक भागांत पेरलेले भात रुजलेलेच नाही, तर काही ठिकाणी थोडेफार उगवलेले पीकही पुढील पाण्याअभावी करपून गेले आहे. कडक उन्हाचा परिणाम भात पेरणीवर स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कोकणात पावसाचे आगमन झाल्यानंतर त्याचा जोर कायम राहतो आणि मुसळधार पाऊस पडतो, असा अनुभव शेतकऱ्यांना आहे.

त्यामुळे यंदाही वेळेवर आणि समाधानकारक पाऊस पडेल, या आशेवर शेतकऱ्यांनी भातशेतीची तयारी केली होती. मात्र सध्याच्या पावसाच्या अनिश्चिततेमुळे कोकणातील भात उत्पादकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. कोकण म्हटलं की डोळ्यांसमोर उभं राहतं ते हिरवागार निसर्गसौंदर्य, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या-नाले आणि पावसाच्या सरींनी न्हाऊन निघालेली सृष्टी. पावसाळ्यात कोकणचे रूप अधिक खुलून येते. मात्र यंदा पावसाने काहीशी पाठ फिरवल्याने कोकणातील शेतकरी चिंतेत आहे. जून-जुलै महिन्यात भातशेतीसह काजू, आंबा यांसारख्या पिकांसाठीही पावसाची मोठी आवश्यकता असते. मात्र पावसाअभावी कोकणातील पाण्याचे स्रोत कमी होऊ लागले आहेत. आकाशात काळे ढग दाटून आले की शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर काही क्षण आशेची किरणे उमटतात; पण ते ढग पाऊस न देता पुढे निघून गेले की पुन्हा निराशा पदरी पडते. सांगली आणि सातारा जिल्ह्यातील काही भाग पूर्वी तीव्र दुष्काळासाठी ओळखले जायचे. या दुष्काळी गावांमधील पाण्यासाठी ग्रामस्थांची होणारी वणवण आजही अनेकांच्या स्मरणात आहे. मात्र ताकारीसारख्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे कवठेमहांकाळ, आटपाडी यांसारख्या दुष्काळग्रस्त तालुक्यांतील अनेक गावांची पाण्याची स्थिती बदलली आहे.

सांगली जिल्ह्यातील जतसारख्या भागातही पाणी उपलब्धतेमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. एकेकाळी दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आकाशात दाटून येणाऱ्या ढगांकडे आशेने पाहत असे; पण पाऊस न पडता ढग पुढे सरकले की त्याच्या पदरी निराशाच येत असे. आज कोकणातील शेतकऱ्याचीही काहीशी अशीच अवस्था झाली आहे. आकाशातील काळ्या ढगांकडे तो आशेने पाहतोय, मात्र पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाच्या अनिश्चिततेचा परिणाम आंबा आणि काजू व्यवसायावरही झाला आहे. काही भागात आंब्याचे उत्पादन कमी झाले असून काही बागायतदारांना नुकसान सहन करावे लागले. मात्र काही शेतकऱ्यांना निसगार्ने साथ दिल्याने त्यांनी या संकटातून काही प्रमाणात सावरण्याचा प्रयत्न केला आहे. सध्याची परिस्थिती पाहता अनेक ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी १९७२ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळाची आठवण काढत आहेत. त्या काळातील संकट पुन्हा येऊ नये, अशीच सर्वांची अपेक्षा आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील शेतकरी आता एका आशेवर आहेत—केव्हा एकदा पावसाची संततधार सुरू होते आणि संपूर्ण कोकण पुन्हा हिरवाईने न्हाऊन निघते, याची ते आतुरतेने वाट पाहत आहेत.

इज्जतीचा पंचनामा

युद्ध विश्रांतीच्या तयारीवर स्वाक्षरी झाल्यानंतर मूळ मसुद्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ट्रम्प काहीतरी कुरापत काढतील, असा संशय होता. पण, ठरलेल्या वेळेपूर्वीच आपली स्वाक्षरी करणं, इराणच्या राष्ट्रप्रमुखांसमोर येणं टाळणं आणि जी - ७ राष्ट्रांच्या बैठकीवेळी अन्य सर्व राष्ट्रप्रमुखांशी बरोबरीच्या नात्याने वागणं- या सगळ्यांतून ट्रम्प यांची कढी किती पातळ झाली आहे, तेच समोर आलं.

जीशांतता आधी मोफत होती, ती स्वतःच्याच आगळिकीने बिघडवली आणि सरतेशेवटी त्याच शांततेसाठी मोठी किंमत चुकवली... इराण आणि अमेरिकेमध्ये झालेल्या ६० दिवसांच्या युद्ध विश्रांती करारात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही मिळवलं असेल, तर ते हेच! इराणचा अणुकार्यक्रम थांबवण्याचा, त्यांच्याकडील युरेनियमचा साठा काढून घेण्याचा, इराणमधील धर्मांध-एकाधिकारी राजवट उलथवून जनताभिमुख सरकार आणण्याचा उद्देश ट्रम्प यांनी युद्धाच्या सुरुवातीला बोलून दाखवला होता. जगाचा काय, इस्रायलचाही त्यावर विश्वास नव्हता. अमेरिकेतल्या जनतेला तर यातला एकही उद्देश मान्य नव्हता. तरीही या सगळ्यांतून 'ग्रेट अमेरिका' हे आपलं मूळ उद्दिष्ट साध्य होणार आहे, अमेरिकेतील जनतेला याचे खूप लाभ होणार आहेत, असं ट्रम्प सांगत राहिले. पहिला हल्ला केल्यानंतर इस्रायलच्या समर्थनार्थ युद्धात उतरताना ट्रम्प यांची भाषा अत्यंत गुमीर्ची होती. तंत्रज्ञानाच्या अचूक कामगिरीने इराणचे सर्वोच्च नेते आणि लष्करातील वरिष्ठ अधिकारी अगदी सहज संपवल्याने इराण म्हणजे एका चिलटापेक्षा अधिक नाही; आठवडाभरात इराण संपलेला असेल, अशीच ट्रम्प यांची भाषा होती. अमेरिका कशी वेगाने सरशी मिळवते आहे, हेही ते रेटून बोलत होते. पण, दोन महिने उलटून गेले, तरी इराण मागे हटेना, युरोपातील एकेक देश साथ सोडू लागले आणि इंधन टंचाईने भयभीत झालेले इतर देशही साफ दुर्लक्ष करू लागले, त्यांच्या वक्तव्यांना प्रतिसाद देईनासे झाले, तेव्हा ट्रम्प काहीसे ताळ्यावर आले. तीन महिने उलटल्यानंतर तर ते उघड उघड परतीचा मार्ग शोधू लागले! इराण, चीन आणि त्यांना पडद्याआडून समर्थन देणाऱ्या देशांनी ट्रम्प यांचा पाय बेचक्यात अडकल्याचं हेरलं आणि आपली भूमिका अधिक ताठर केली. शेवटी ट्रम्प यांना पाकिस्तान आणि कतारसारख्या किरकोळ मध्यस्थांना पुढे करून इराणची समजूत काढावी लागली. त्यातून ६० दिवसांची युद्धविश्रांती विकत घ्यावी लागली!! युद्ध विश्रांतीच्या तयारीवर स्वाक्षरी झाल्यानंतर मूळ मसुद्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ट्रम्प काहीतरी कुरापत काढतील, असा संशय होता. पण, ठरलेल्या वेळेपूर्वीच आपली स्वाक्षरी करणं, इराणच्या राष्ट्रप्रमुखांसमोर येणं टाळणं आणि जी - ७ राष्ट्रांच्या बैठकीवेळी अन्य सर्व राष्ट्रप्रमुखांशी बरोबरीच्या नात्याने वागणं - या सगळ्यांतून ट्रम्प यांची कढी किती पातळ झाली आहे, तेच समोर आलं. जगासाठी; विशेषतः अमेरिकेसाठी हीच या युद्धाची सगळ्यात मोठी कमाई आहे. युद्धविश्रांतीच्या करारातील १४ कलमांपैकी एकही कलम अमेरिकेच्या वर्चस्वाची, इराण नरमल्याची साक्ष देणारं नाही. उलट, विश्रांतीच्या तीनही प्रस्तावांदरम्यान इराणने आपल्या मागण्या कायम ठेवल्या आणि त्या पुरेपूर पदरात पाडून घेतल्याचं दिसतं आहे. १०७ दिवसांच्या युद्धकाळात इराणच्या झालेल्या स्थावर आणि लष्करी नुकसानीबद्दल अमेरिकेने इराणला ३०० अब्ज डॉलर नुकसान भरपाई द्यावी, ही मागणी ट्रम्प अगदी पहिल्या सह्या झाल्यानंतरही उडवून लावत होते. पण, प्रत्यक्ष १४ कलमांत या कलमाचा समावेश आहे. अमेरिकेने इराणमध्ये ३०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचं केवळ ६० दिवसांच्या युद्धविश्रांतीसाठी मान्य केलं गेलं आहे! या गुंतवणुकीतून उभ्या राहणाऱ्या बऱ्याच प्रकल्पांची कंत्राटं पुन्हा ट्रम्प यांच्याच कंपन्या घेतील, अशी टिप्पणी सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर केली जाते आहे. ते खरंच साधायचं असेल, तर ट्रम्प यांना अंतिम करारात इराणला आणखी मोकळी द्यावी लागेल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि व्यापारी ट्रम्प यांच्यात कोण भारी पडतं, ते तेव्हां आपल्याला कळेल. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र हा इराण आणि अमेरिकेतील वादाचा मुद्दा होता. या क्षेपणास्त्रांची निर्मिती इराणने थांबवावी, असा ट्रम्प यांचा आग्रह होता. पण, परवा बोलताना ही क्षेपणास्त्रं इराणसाठी कशी आवश्यक आहेत, हे ट्रम्पच सांगत होते. बराक ओबामा यांनी २०१५ मध्ये केलेल्या करारापेक्षा या करारात काहीही 'ग्रेट' नाही. हे युद्ध सुरू होण्यापूर्वी, २०१५ च्या कराराच्या नूतनीकरणासाठी जी बोलणी सुरू होती, त्यात इराणने आपला युरेनियमचा ८० टक्के साठा देशाबाहेर काढून तटस्थ देशात ठेवण्याचं कबूल केलं होतं. इराण आपला अणुकार्यक्रम पूर्णपणे गुंडाळायला तयार नाही, शेजारी आखाती देशांची सुरक्षितता त्यामुळे धोक्यात आहे, या कारणांसाठी तर बोलणी बाजूला सारून ट्रम्प यांनी युद्ध छेडलं होतं. जे त्या बोलण्यांमध्ये मान्य होत होतं, ते मान्य करायलाही आता इराण तयार नाही. मग ट्रम्प यांनी कमावलं काय? या प्रश्नाचं उत्तर दिसतं ते असं : आर्थिक अडचणीत असलेल्या अमेरिकेचा खोलात जाणारा पाय त्यांनी सावरला. अमेरिकेतल्या मध्यावधी निवडणुकीत मोठा फटका बसू नये, म्हणून ६० दिवसांचा 'टाईम प्लीज' मिळवला. चर्चेचा घोळ सुरू ठेवून त्यादरम्यान पुन्हा उलटसुलट वक्तव्य करायची आणि अमेरिकेतल्या मतदाराला तोंड दाखवायला जागा ठेवायची, एवढाच या सगळ्याचा हेतू आहे.

सावनेर कॉरिडॉरसमोर आव्हाने

नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथे प्रस्तावित संरक्षण, अणुऊर्जा आणि विमान उद्योग कॉरिडॉर प्रकल्पाला राज्य शासनाने औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना जारी करून गती दिली आहे. मात्र २ हजार ७३० हेक्टर जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांचा विरोध, स्थानिक राजकारण आणि प्रशासकीय आव्हानांमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी हीच खरी कसोटी ठरणार आहे.



नागपूर जिल्ह्यातील सावनेर परिसरात प्रस्तावित असलेल्या संरक्षण, अणुऊर्जा, विमान उद्योग कॉरिडॉर प्रकल्पाला महत्त्वपूर्ण गती मिळाली असून महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने या प्रकल्पासाठी आवश्यक औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना जारी केली असल्याचे वृत्त आहे. उद्योग ऊर्जा कामगार आणि खणीकर्म विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत सावनेर तालुक्यातील नऊ गावातील एकूण २७२९.८२ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पासाठी औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

नागपूर हे देशाचे हृदय स्थान म्हणून ओळखले जाते. इथे संरक्षणविषयक उद्योग यापूर्वीच उभे झालेले आहेत. नागपूरजवळ वाडी येथे डिफेन्स प्रोजेक्ट हा केंद्र सरकारचा एक उद्योग कार्यरत आहे. भंडारा जिल्ह्यातही जवाहर नगर येथे ऑर्डनन्स फॅक्टरी कार्यरत आहे. नागपूर जवळ ब्रह्मोस हे विमानांचे स्पेअर पार्ट्स बनवणारे केंद्र देखील कार्यरत आहे. नागपुरात असलेले जुने विमानतळ विकसित होऊन तिथे मिहान क्षेत्र देखील विकसित झाले आहे. मल्टीनोडल कार्गोहब म्हणून नागपूरची नवी ओळख आता झालेली आहे. याशिवाय खासगी क्षेत्रात सोलार एक्सप्लोजिव्हजसारखे उद्योग देखील सक्रिय आहेत. त्यात आता हा संरक्षण अणुऊर्जा विमान उद्योगाचा प्रकल्प सावनेरमध्ये उभा राहणार असल्यामुळे फक्त भारतातच नव्हे तर जागतिक नकाशावर आता नागपूरचे महत्त्व निश्चितच वाढणार आहे.

१२ जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार सावनेर तालुक्यातील खुरसापार जोगा, जयतपूर, छतरपूर, माळेगाव, नांदा गोमुख सालई सावळी आणि जटामखोरा या गावातील विस्तृत भूभाग या प्रकल्पासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. यामुळे सावनेर परिसरात संरक्षण, अणुऊर्जा, विमान निर्मिती, रोबोटिक्स अशा प्रगत अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळणार आहे.

या कॉरिडॉरमुळे विमाने ड्रोन उपग्रहाला लागणारे सुटे भाग, संरक्षण साहित्य, क्षेपणास्त्र प्रणाली, तसेच अणुऊर्जा तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योगांना प्रोत्साहन मिळणार आहे. त्यामुळे हजारो युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठी औद्योगिक गुंतवणूक आकर्षित होऊ शकेल. नागपूर जिल्ह्यातील सावनेर विधानसभा क्षेत्र हे मधल्या काळात काहीसे वादग्रस्त राहिले होते. १९९५ पर्यंत इथे रणजित देशमुख आमदार होते. १९९५ मध्ये त्यांचा पराभव करून अपक्ष सुनील केदार निवडून आले होते. सुनील केदार हे नागपूर जिल्ह्यातील सहकार महर्षी बाबासाहेब केदार यांचे सुपुत्र आहेत. त्यामुळे बाबासाहेबांचा जनसंपर्क त्यांच्या कामी आला होता. सुनील केदार हे २०१४ पर्यंत या क्षेत्राचे आमदार राहिले.

त्यानंतर २०१९ मध्ये पुन्हा एकदा ते निवडून आले होते. मात्र त्यांची कारकीर्द कायम वादग्रस्तच राहिली. २००२ मध्येच नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २५० कोटींच्या कर्जरोखे घोटाळ्यातील प्रमुख आरोपी म्हणून त्यांना अटक झाली होती. त्यावेळी दीर्घकाळ ते तुरुंगात राहिले होते. नंतर ते पुन्हा सुटून बाहेर आले. या कर्जरोखे घोटाळ्याचा खटला दीर्घकाळ चालला. त्यानंतर २०२३ मध्ये या खटल्याचा निकाल लागून सुनील केदारांना शिक्षाही झाली होती. त्यामुळे त्यांची आमदारकी गेली. आमदारकी गेली असली तरी त्यांची मतदारसंघात दहशत कायम होतीच. त्यातच उबाठा सरकारमध्ये काही काळ ते मंत्री देखील राहिले होते. त्यामुळे दहशत अधिकच वाढली होती. २०१४ ते २०१९ या काळात रणजीत देशमुख यांचे चिरंजीव डॉ. आशिष देशमुख हे सावनेरमधून निवडून आले होते.

२०२४ मध्ये देखील भाजपचे उमेदवार म्हणून आशिष देशमुखच निवडून आलेले आहेत. ते तरुण असून त्यांना विकासाची दृष्टी देखील आहे. त्यामुळेच त्यांनी या प्रकल्पासाठी दीर्घकाळ पाठपुरावा केला. परिणामी हा प्रकल्प आता शासनाने मंजूर केला असून भूमी अधिग्रहणाची प्रक्रिया देखील आता सुरू होते आहे. मात्र इथेच आता प्रशासन आणि आशिष देशमुखांसह सर्व राजकीय नेत्यांची कसोटी लागणार आहे. या प्रकल्पासाठी जवळजवळ २७३० हेक्टर शेतजमीन अधिग्रहित केली जाणार आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध होणे साहजिकच आहे. त्यातच आशिष देशमुख यांचे विरोधक विशेषतः सुनील केदार गट हा गावकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना उचकवून या प्रकल्पाविरुद्ध आंदोलन करण्यासाठी भाग पाडेल हे चित्र आज निश्चित दिसते आहे. अशी आंदोलने, भूमी अधिग्रहणाला विरोध होणे, सरकारी अधिकाऱ्यांना जमीन मोजणी करायला मज्जाव करणे अशा प्रकारांमुळे प्रकल्प रेंगाळूदेखील शकेल ही शक्यता नाकारता येत नाही.

साधारणपणे कोणताही नवा प्रकल्प येणार म्हटले की, त्यासाठी लागणारी जमीन मिळवणे हे एक जिकिरीचे काम असते. अशा जमिनीसाठी जेव्हा सरकारकडून भूमी अधिग्रहण होते तेव्हा शेतकऱ्यांचा तीव्र विरोध होतो. त्यात मग शेतकऱ्यांना प्रसंगी जास्त भाव द्यावा लागतो आणि हा जास्त द्यावा लागलेला भाव आणि या सगळ्या प्रकारात झालेला उशीर यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत जाते. नागपूर नजीक झालेल्या मिहान प्रकल्पाचा विचार सर्वप्रथम २००२ मध्ये पुढे आला. मात्र त्यावेळी जमिनी जाणार म्हणून शेतकऱ्यांनी जो काही विरोध सुरू केला तो दीर्घकाळ चालला. शेतकरी आणि सरकार यांच्यातील संघर्ष देवेंद्र फडणवीस सरकार येईपर्यंत सुरूच होता. त्यानंतर हळूहळू प्रश्न सुटले आणि मिहान प्रकल्प पूर्णत्वाला जायला सुरुवात झाली.

अजूनही नागपूर विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या योजना रखडतच आहेत. जो प्रकार मिहानबाबत झाला तोच प्रकार नागपूरचा रिंग रोड, आऊटर रिंग रोड यांच्याबाबतही झाला आणि आता तिसरा रिंग रोड बाबतही तोच प्रकार सुरू आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून उभारल्या जाणाऱ्या नवीन नागपूर प्रकल्पाचेही तेच हाल सुरू आहेत. कोणताही प्रकल्प उभा करायचा म्हटला की सर्वप्रथम शेतकरी विरोध करायला सुरुवात करतात. अशावेळी स्थानिक विरोधी नेत्यांनी विकासाची दृष्टी न ठेवता विरोधाकरता विरोध करायला सुरुवात केली, तर प्रकरण जास्त चिघळत जाते. नागपूर जिल्ह्यातील बहुतेक सर्व प्रकल्पांबाबत आतापर्यंत हेच घडत आलेले आहे. विदर्भात कोणतेही नवीन प्रकल्प सुरू करायचे तर झुडपी जंगलाचा सुद्ध

उभ्याने पाणी पित असाल तर ७ नुकसान जाणून घ्या



बरेच लोक उभं राहून आणि घाईघाईत चालताना पटकन पाणी पितात, पण तुम्ही ज्या स्थितीत पाणी पितात त्याचा तुमच्या आरोग्यावरही परिणाम होतो हे तुम्हाला माहीत नसेल. चला जाणून घेऊया उभे राहून पाणी पिण्याचे तोटे –

१. उभे राहून पाणी प्यायल्याने ते पाणी दाबाने पोटात जाते आणि या पाण्याची अशुद्धता मूत्राशयात साठते ज्यामुळे शरीराच्या किडनीला गंभीर नुकसान होते.

२. जेव्हा तुम्ही उभे राहून पाणी पितात तेव्हा अन्ननलिकेद्वारे दाबाने पाणी पोटात झपाट्याने पोहोचते आणि पाण्याच्या दाबाने पोट आणि त्याच्या आजूबाजूच्या भागाचे आपल्या पचनसंस्थेचे नुकसान होते.

३. उभे राहून पाणी पिल्याने आपल्याला तृप्ति वाटत नाही, तहान नीट शमत नाही आणि त्यामुळेच आपल्याला वारंवार तहान लागते.

४. उभे राहून पाणी पिण्याचाही आपल्या फुफ्फुसांवर वाईट परिणाम होतो कारण त्यामुळे आपल्या फूड पाइप आणि विंड पाइपमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा थांबतो.

५. जे लोक नेहमी उभे राहून पाणी पितात, त्यांना फुफ्फुस आणि हृदयाशी संबंधित आजार होण्याची शक्यता असते. म्हणून उभे असताना कधीही पाणी पिऊ नका, कारण पाण्याचा दाब तुमच्या शरीराच्या संपूर्ण जैविक प्रणालीवर परिणाम करतो.

६. उभे राहून पाणी प्यायल्याने ते शरीरातून जाते आणि सांध्यांमध्ये जमा होते. ज्यामुळे हाडे आणि सांधे धोक्यात येऊ शकतात. यामुळे सांध्यातील द्रवपदार्थाच्या कमतरतेमुळे, वेदनासह अशक्तपणा येऊ लागतो. कमकुवत हाडांमुळे, व्यक्तीला संधिवात सारखे आजार होऊ शकतात.

७. तुमचा यावर विश्वास बसणार नाही, पण उभे राहून पाणी प्यायल्याने तुमचा ताणही वाढू शकतो. खरं तर आपण उभे राहून पाणी प्यायलो तर त्याचा थेट परिणाम आपल्या मज्जासंस्थेवर होतो. अशा प्रकारे पाणी प्यायल्याने पोषक तत्व पूर्णपणे निरुपयोगी होतात आणि शरीरावर ताण येतो.

अस्वीकरण : औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष इत्यादी विषयांवर वेब जगतात प्रकाशित/प्रसारण केलेले व्हिडिओ, लेख आणि बातम्या फक्त तुमच्या माहितीसाठी आहेत. या संबंधी कोणताही प्रयोग करण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्या.

अशा पद्धतीने घरीच तयार करा फाऊंडेशन पावडर




सध्या लग्नसराईचा काळ सुरू आहे. आज कोणा मैत्रिणीचा साखरपुडा आहे तर उद्या मित्राचं लग्न. घरातही कोणत्या ना कोणत्या नातेवाईकाचे लग्न असतेच. या सगळ्यात प्रत्येक वेळी पार्लरमध्ये जाऊन मेकअप करणं परवडणारं असतंच असं नाही. अनेकदा फाऊंडेशन, काजळ, लिपस्टिक आणि आयलायनर लावूनही मुली सुंदर दिसतात. पण तुम्हाला माहीत आहे का बाजारात मिळणारे फाऊंडेशन तुम्ही अगदी काही मिनिटांत घरच्या घरी करू शकता. तुम्ही हजारो रुपये महागड्या फाऊंडेशनसाठी खर्च करता का? तुम्ही जे महागडे मेकअपचे साहित्य वापरता त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टी या त्वचेसाठी हानीकारक असतात. पण हेच मेकअपचे साहित्य जर तुम्हाला घरी तयार करता आले तर? चला तर मग घरच्या घरी फाऊंडेशन पावडर कसे तयार केले जाऊ शकते ते वाचू..

साहित्य :
- ऑलीव ऑईल
- जोजोबा ऑईल
- बदामाचे तेल
- चेहऱ्याला लावायची पावडर
- कोको पावडर

कृती :
चेहऱ्याला लावायच्या पावडरमध्ये कोको पावडर, ऑलीव ऑईल, जोजोबा ऑईल, बदामाचे तेल योग्य प्रमाणात टाका. हे मिश्रण जास्त जाड ही नको आणि जास्त पातळ ही नको. तयार झालेली पावडर बॉक्समध्ये टाकून सेट करा. १० मिनिटांत तयार आहे घरच्या घरी फाऊंडेशन पावडर.

ब्राऊन राईस खा आणि निरोगी राहा



तुम्हाला भात मनापासून आवडत असेल, पण वजन वाढेल या भीतीने तुम्ही तुमच्या आवडत्या अन्न पदार्थापासून लांब राहत असाल, तर आता तुम्हाला तुमचा मोह आवरण्याची जरासुद्धा गरज नाही. तुम्ही तुमच्या आहारामध्ये ब्राऊन राईस समाविष्ट करा आणि वजन वाढेल याची काळजी न करता भाताचे सेवन करा. ब्राऊन राईस म्हणजे नक्की काय, तर पॉलिश न केलेल्या, अन-रिफाइन्ड तांदळाला ब्राऊन राईस असे म्हटले जाते. तांदळाच्या दाण्याला सालीची दोन ते तीन आवरणे असतात. ब्राऊन राईस तयार करण्यासाठी तांदळावरील केवळ सर्वात बाहेरची, जाडसर असलेली साल काढली जाते. बाकीच्या पातळ साली तांदळावर तशाच ठेवल्या जातात, म्हणूनच हा तांदूळ दिसायला 'ब्राऊन', म्हणजेच भुरकट रंगाचा दिसतो. पांढरा तांदूळ तयार होताना त्यावरील सर्वच सालींची आवरणे काढून टाकली जातात, त्यामुळे तो तांदूळ शुभ्र पांढरा दिसतो. पण पांढऱ्या तांदळामध्ये केवळ स्टार्च असतो.

ब्राऊन राईस आणि पांढऱ्या तांदळामध्ये कॅलरीज आणि कर्बोदकांचे प्रमाण जरी एकसमान असले, तरी पांढरा तांदूळ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये, त्यामध्ये असलेले बी३, बी१, बी६, ही जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह, फायबर आणि फॅटी ॲसिड्स ही पोषक तत्त्वे पूर्णतः नष्ट होऊन जातात. त्यामुळे पांढऱ्या तांदळापेक्षा ब्राऊन राईसचे सेवन आरोग्यास अधिक हितकारी असल्याचे आहारतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ब्राऊन राईस मध्ये कर्बोदके, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, थियामीन, फॉस्फरस, पोटॅशियम इत्यादी महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वे असून, याचे सेवन शरीराच्या आरोग्यासाठी अतिशय फायद्याचे आहे.

ब्राऊन राईसमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असून, यामुळे रक्तामधील घातक कोलेस्टेरोलचे प्रमाण कमी होते. तसेच रक्तामधील शुगर नियंत्रित होते.

त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना याच्या सेवनाने विशेष फायदा मिळतो. फायबरचे प्रमाण यामध्ये जास्त असल्याने भूक शमते, तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होते. त्यामुळे बद्धकोष्ठ किंवा पचनाशी निगडित इतर समस्या दूर होतात.

फायबरमुळे कोलोन आणि पचनेन्द्रियाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत होते व कोलेस्टेरोलचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते.

ब्राऊन राईसमध्ये असलेल्या सेलेनियम आणि फेनोल्स या तत्त्वांमुळे कोलोन कॅन्सर होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच ही तत्त्वे थायरॉइड ग्रंथीचे कार्य नियंत्रित करण्यास सहाय्यक आहेत. यामध्ये असलेले मॅग्नेशियम हाडांच्या आरोग्यासाठी चांगले असून, त्यामुळे नर्व्हस सिस्टमही चांगली राहते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास देखील ही सर्व तत्त्वे सहाय्यक आहेत. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पोट खूप काळ भरलेले राहते. त्यामुळे भूक लागणे कमी होऊन, वारंवार काही ना काही खात राहण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी वजन घटण्यास मदत होते.

मणक्याच्या समस्यांदूर करण्यासाठी हे योगासन करा, लवकर फायदे मिळतील



स्कोलियोसिस ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये पाठीचा कणा एका बाजूला वाकतो. साधारणपणे याचा मणक्याच्या वरच्या भागावर परिणाम होतो आणि पाठीच्या खालच्या भागाला वक्रता येते. जेव्हा स्कोलियोसिसची समस्या असते तेव्हा वेदना वाढते आणि शस्त्रक्रियेची स्थिती येते. मात्र, मणक्याची समस्या नैसर्गिक पद्धतीने कमी करता येते. मणक्याच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी योग हा एक प्रभावी मार्ग आहे. आठवड्यातून किमान तीन दिवस ९० सेकंद फक्त एक योगाभ्यास करून स्कोलियोसिसच्या समस्येपासून आराम मिळू शकतो.


वसिष्ठासन (साइड प्लैंक)– वशिष्ठासनाचा सराव जेव्हा स्कोलियोसिसचा त्रास असेल तेव्हा करावा. मणक्याच्या कमकुवत बाजूला साइड प्लैंकचा सराव करा. या योगाच्या अभ्यासासाठी प्रथम दंडासन आसनात जमिनीवर बसावे. नंतर डावा हात जमिनीवर ठेवून त्यावर शरीराचे वजन ठेवावे. आता डावा पाय उजव्या पायावर ठेवा आणि उजवा हात वर करून मांड्यांवर ठेवा. श्वास घेत असताना, काही क्षण या स्थितीत रहा. श्वास सोडल्यानंतर, सामान्य स्थितीत परत या.

मार्जरी आसन– पाठ किंवा मणक्यात दुखत असेल तर मार्जरी आसन करावे. त्याच्या सरावासाठी, गुडघ्यावर आणि हातावर येताना पाठीचा कणा वर ठेवा. श्वास घेताना, डोके छताच्या दिशेने वर करा आणि शरीराच्या नाभीचा भाग खाली वाकवा. श्वास सोडताना हनुवटी छातीला लावा आणि पाठीचा कणा उचला. या आसनाचा सराव चार ते पाच वेळा करा.

पादहस्तासन– या आसनाच्या सरावासाठी सरळ उभे राहून हात शरीराला जोडून ठेवा. आतून श्वास घेत हात डोक्याच्या वर घ्या आणि वर ओढा. नंतर श्वास सोडताना पाठीचा कणा सरळ ठेवा. या दरम्यान, गुडघे आणि हात सरळ ठेवून पुढे वाका. आता हात जमिनीवर ठेवा किंवा टाचांना धरण्याचा प्रयत्न करा

टीप – योगाभ्यास करण्यापूर्वी डॉक्टरांचे मत घेऊन योगतज्ञांच्या देखरेखीखालीच योगाभ्यास करा

मेथी पनीर



साहित्य : १ मोठी जुडी मेथी, पानं खुडून धुवून घ्यावी. १५० ग्राम पनीर, लहान तुकडे, १ लहान कांदा, पातळ उभा कापून, १ मध्यम टोमॅटो, मध्यमसर चौकोनी तुकडे, १/२ इंच आलं, ३ ते ४ मोठ्या लसूण पाकळ्या, चिरून, २ ते ४ काळी मिरी, १ टेस्पून दही, १/२ कप क्रिम, फोडणीसाठीः १ + १ टेस्पून तेल, चिमूटभर हळद, १ टिस्पून धणे पावडर, चवीपुरते मिठ

कृती : १ टेस्पून तेल पॅनमध्ये गरम करावे. त्यात काळी मिरी, आले, लसूण आणि कांदा घालावा. कांदा लालसर होईस्तोवर परतावे. आता चिरलेला टोमॅटो घालून मऊ होईस्तोवर शिजवावा. गॅस बंद करून हे मिश्रण थंड होवू द्यावे. थंड झाले कि पाणी न घालता प्युरी करून घ्यावी. मेथीची पाने बारीक चिरून घ्यावी. १ टेस्पून तेल पॅनमध्ये गरम करावे. हळद आणि मेथी घालावी बरोबर २-३ चिमटी मिठही घालावे. झाकण न ठेवता मेथी परतावी. मेथीतील पाण्याचा अंश निघून कोरडी झाली कि कांदा-टोमॅटोची प्युरी आणि दही घालावे. निट ढवळून थोडावेळ शिजू द्यावे. धणेपुड आणि गरजेपुरते मिठ घालावे, मिक्स करावे. गॅस अगदी मंद करावा (टीप). पनीर आणि क्रिम घालावे. तसेच लागल्यास थोडे पाणी घालून ढवळावे. खुप पाणी घालू नये कारण मिश्रण जास्त उकळवायचे नाहीये, फक्त खुप घट्ट वाटल्यासच पाणी घालावे. तयार भाजी पोळी, नान बरोबर सर्व्ह करावी.

टीपा : रेडीमेड पनीर वापरत असाल तर पनीरचे लहान चौकोनी तुकडे करून गरम पाण्यात २-३ मिनीटे बुडवून ठेवावे. यामुळे पनीर नरम होते. जर क्रिम उपलब्ध नसेल तर, १/२ कप मिल्क पावडर १/४ कप पाण्यात मिक्स करून वापरली तरीही चालेल. गॅसची आच एकदम मंद करूनच क्रिम भाजीत घालावे तसेच एकदा क्रिम घातले कि भाजी जास्तवेळ गरम करू नये. यामुळे क्रिम भाजीत फुटते.

दररोज जेवणात टाका चिमूटभर हिंग कधी होणार नाही हे ५ आजार

गुलाबाची मोहकता आणि मंद सुगंध नेहमीच आपला मूड तत्काळ रिफ्रेश करायला मदत करतो. पण केवळ बुकेमध्ये किंवा गजरा आणि हारांपुरताच फुलांचा वापर नसतो. गुलाब हे फूल जितके मोहक दिसते तितकेच त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत.

पोटासंबंधी आजार

हिंग पोटासाठी अत्यंत फायदेशीर आहे. दररोज हिंगाचे सेवन केल्याने पोटासंबंधी समस्या जसे अपचन, गॅस सारख्या समस्या दूर होतात. याने पोटात गॅस, पोटातील किडे, मरोड आणि पोटासंबंधी सर्व वेदनांपासून मुक्ती मिळते.

बीपीची समस्या

हिंगात रक्त पातळ करण्याचे गुण असतात. म्हणून हे ब्लड प्रेशरच्या आजाराने त्रस्त लोकांसाठी फायदेशीर आहे. याने नसांमध्ये बल्ड क्लॉटिंग सारखी समस्या होत नाही ज्याने ब्लड प्रेशर अनियंत्रित होण्यापासून मुक्ती मिळते.

श्वासासंबंधी आजार

खोकल्याची समस्या असल्यास हिंगाचे सेवन फायदेशीर आहे. हिंग सामान्य खोकला, कोरडा खोकला, इंफ्लूएंजा, ब्रोन्काइटिस आणि दमा सारख्या आजारापासून दूर ठेवतं. डाळ, सांभार आणि भाज्यामध्ये हिंग वापरलं जाऊ शकतं. श्वासासंबंधी आजार असल्यास हिंगात जरासं पाणी मिसळून छातीला लावल्याने आराम मिळतो.

भारतीय जेवणात स्वाद आणि सुगंध वाढवण्यासाठी हिंगाची फोडणी दिली जाते. हिंगाचा सुवास तेज आणि जेवण्याची इच्छा जागृत करणारा असतो. आयुर्वेदात देखील याचे अनेक फायदे सांगितले गेले आहेत. आपण दररोज चिमूटभर हिंग वापराल तर अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकेल. हिंग पोट, लिव्हर आणि डोळ्यासाठी फायदेशीर ठरतो. जाणून घ्या रोज हिंगाचे सेवन केल्याने आरोग्यावर काय प्रभाव पडेल.



याव्यतिरिक्त खोकला आणि दमा सारख्या आजारात आपण हिंगात मध मिसळून सेवन करू शकता.

मासिक धर्म

अनेक महिलांना मासिक धर्म दरम्यान वेदना सहन कराव्या लागतात. दररोज हिंगाचे सेवन केल्याने या दरम्यान होणाऱ्या वेदनांपासून मुक्ती मिळते.

हिंग प्रोजेस्ट्रॉन हार्मोन्स उत्पादनात मदत करतं, ज्याने ब्लड फ्लो सुरळीत राहतं. पीरियड्सदरम्यान वेदनापासून मुक्तीसाठी एक ग्लास ताकात २ चिमूट काळं मीठ आणि १ चिमूट हिंग मिसळून प्यावं.

डोकेदुखी

हिंगात शरीरातील आंतरिक सूज कमी करण्याची क्षमता असते. साधारणतः डोक्यातील आर्ट्रिजमध्ये सूज असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागतो. अशात रोज हिंगाचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून मुक्ती मिळू शकते. डोकेदुखीचे प्रमाण अधिक असल्यास एका ग्लासात २ चिमूट हिंग उकळून घ्या. कोमट झाल्यावर दिवसातून दोनदा प्यावे.

गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय!



सौंदर्य खुलवण्यासाठीदेखील गुलाब फायदेशीर ठरते. त्यामधील मॉइश्चरायझिंग घटक, टोनिंग करण्याची क्षमता त्वचेमधील दाह कमी करून त्वचेला सतेज बनवते. गुलाबाचे आरोग्यदायी गुणधर्म, सौंदर्य खुलवण्याची क्षमता यासोबतीने केसांचीही चमक वाढवण्यासाठी फायदा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का? म्हणूनच केसांचे आरोग्य जपण्यासाठी ब्युटी एक्स्पर्ट दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.

गुलाबपाणी कसे ठरते फायदेशीर?

गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून लावल्यास त्वचेला हायड्रेट करतात, पण त्यासोबतच त्वचेला सतेज करण्यास, मॉईश्चराईज्ड करण्यास मदत करतात. मात्र गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून केसांना लावल्यास टाळूवरील अतिरिक्त तेल प्रमाणात राहण्यास मदत होते. सोबतच टाळूवरील pH balance राखण्यास मदत होते. यासोबतच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि ॲण्टीऑक्सिडंट घटक यांचा मुबलक साठा असतो. गुलाबातील इसेन्शियल ऑईल शुष्क त्वचेची समस्या आटोक्यात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शाम्पूसोबत त्याचा वापर केल्यास टाळूवरील त्वचा मॉईश्चराईज्ड होण्यास मदत होते तसेच हेअर फोलिकल्स मजबूत होतात.

फ्रिझी आणि निस्तेज केसांवर कशाप्रकारे वापराल गुलाब पाणी?



निस्तेज केसांसाठी

केसांवर कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायर वापरत असाल तर केसांचे नुकसान होते. केस अधिक शुष्क होतात. केसांना पुन्हा सतेज करण्यासाठी गुलाबपाणी फायदेशीर ठरते. याकरिता जोजोबा ऑईलमध्ये गुलाबपाणी मिसळा. या मिश्रणाने टाळूवर हलकासा मसाज करा.

मसाज केल्यानंतर सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवावेत. या उपायाने केसांचे नुकसान आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायरमुळे केस खराब झाल्यास हा उपचार फायदेशीर ठरतो.

फ्रिझी हेअर

फ्रिझी हेअरचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी गुलाबपाण्यासोबत कोरफडीचा गर मिसळा. हे मिश्रण एकत्र करून टाळूवर हलकासा मसाज करा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने केस स्वच्छ धुवावेत.

चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे



आजच्या जाहिरातीच्या युगात सारेच टुथपेस्ट ब्रॅण्ड चमकदार दातांचा दावा करतात. डेण्टिस्टकडे चमकदार दातांसाठी अनेक ट्रीटमेंट उपलब्ध असतात. पण अनेक घरगुती उपायांनीही तुम्ही तुमचे दात चमकदार बनवू शकता.

नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल. दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल. ॲपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

जेवण केल्यानंतर लगेच झोपण्याचे दुष्परिणाम

अवेळी, तसेच लगेच झोपे येणे धोकायदायक आहे, अशी झोप टाळली पाहिजे, कारण दुपारी जेवल्यानंतर एक छोटी डुलकी घ्यायची सवय काहींना असते. जेवल्यावर लगेच झोपणे धोकादायक ठरू शकतं. कारण जेवल्यानंतर, नाष्टा केल्यानंतर किंवा काहीही खाल्ल्यानंतर झोपणं हे शरीराच्या आरोग्यासाठी हानीकारक मानलं जातं.

चयापचय म्हणजे पचनास अडथळा : जेवल्यावर तातडीने झोपल्यास पोटात गेलेल्या अन्नाचं योग्य पद्धतीने पचन होत नाही. यामुळे शरीरात एक विशिष्ट प्रकारचं आम्ल तयार होतं आणि ते छातीत जातं. यामुळे अनेक वेळा आंबट ढेकरही येतात. शिवाय अन्नाचं योग्य पद्धतीने पचन न झाल्यास अनेक आजार जडू शकतात.

वजन वाढण्याचे दुष्परिणाम : जर तुम्ही जेवल्यानंतर लगेच झोपलात तर, कॅलरीज योग्य पद्धतीने बर्न होत नाहीत. त्यामुळे वजन वाढण्यास मदत होते. आपणं जेवढं खातो त्यापेक्षा जास्त शरीरातील कॅलरीज बर्न करणं गरजेचं असतं. यामुळे शरीराचं कार्य उत्तम राहण्यास मदत होतं.

ॲसिडीटीचा त्रास वाढतो : ॲसिडीटीमुळे शरीराला फार त्रास होतो, शिवाय झोपही लागत नाही. तातडीने झोपल्याने पोटात आम्ल तयार होतं. यामुळे ॲसिडीटी होण्याची दाट शक्यता असते.

हृदयासंबंधीचे आजार बळावतात : जेवल्या जेवल्या झोपल्याने पचनक्रिया बिघडते. याचा परिणाम रक्तदाब आणि रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं. यामुळे हृदयावर परिणाम होऊन त्यासंबंधीचे आजार बळावू शकतात. त्यामुळे जेवल्यावर तातडीने झोप घेणे धोकेदायक आहे.



पुरवणी मागण्यांचा विक्रम

९७ हजार ७०६ कोटींची तरतूद, शेतकरी कर्जमुक्तीसाठी २० हजार ५५२ कोटी

राज्याच्या सन २०२६-२७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४० हजार ५५२ कोटींच्या महसुली तुटीचा अंदाज असताना राज्य सरकारने सोमवारी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्याच्या सन २०२६-२७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४० हजार ५५२ कोटींच्या महसुली तुटीचा अंदाज असताना राज्य सरकारने सोमवारी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. त्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'साठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेच्या अंतर्गत पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या बिनव्याजी कजार्साठी १० हजार ७ कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सन २०२६-२७ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. या मागणीतील १३ हजार ८२५ कोटी रुपये अनिवार्य खचार्साठी, ६६ हजार ५५९ कोटींची तरतूद कार्यक्रमांतर्गत खचार्साठी आणि १७ हजार ३२१ कोटींची रक्कम केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाच्या अंतर्गत अर्थसहाय्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. या पुरवणी मागण्यांवर पुढील आठवड्यात म्हणजे २९ आणि ३० जून रोजी चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील, अशी माहिती मिळाली.

सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ५ हजार ३६१ कोटी

या पुरवणी मागण्यांमध्ये विभागनिहाय निधीचा विचार केला असता सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागासाठी २२ हजार १५ कोटी, नगरविकास विभागासाठी १५ हजार १५२ कोटी, उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागासाठी १४ हजार ७६० कोटी आणि सार्वजनिक बांधकाम विभागासाठी ५ हजार ३६१ कोटी रुपयांची तरतूद आहे. दरम्यान, सन २०२५-२६ या वर्षातील पुरवणी मागण्यांचा आढावा घेतला असता जून २०२५ मध्ये ५७ हजार ५०९ कोटी, डिसेंबर २०२५ मध्ये ७५ हजार २८६ कोटी आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये ११ हजार ९९५ कोटी रुपयांच्या मागण्या सादर झाल्याचे सांगण्यात आले.

शासकीय कार्यालयांच्या वीजबिलांसाठी ४ हजार कोटी

पुरवणी मागणीतील इतर महत्वाच्या तरतुदींमध्ये शासकीय कार्यालयांच्या वीजबिलांसाठी ४ हजार कोटी, अमृत २.० अभियानासाठी ३ हजार ७६ कोटी तर विविध घटकांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी २ हजार ३६० कोटी रुपयांचा समावेश आहे. अंगणवाडी सेविका आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी १ हजार ७३४ कोटी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदानासाठी ७७७ कोटी, पात्र सहकारी साखर कारखान्यांना सीमांत कजार्साठी ४८३ कोटी आणि नागपूर विधानभवन विस्तारासाठी १०० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

मुंबईतील विविध मेट्रो मार्ग प्रकल्पांसाठी बाह्य वित्तीय संस्थेमार्फत प्राप्त होणारे कर्ज 'एमएमआरडीए'ला उपलब्ध करून देण्यासाठी ३ हजार ३७२ कोटी, ठाणे ते बोरिवली दरम्यान वाहतूक दळणवळणासाठी आणि मुंबईतील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यानच्या भुयारी मागार्साठी राज्य सरकारच्या हिश्श्याची दुय्यम कर्जाची रक्कम 'एमएमआरडीए'ला देण्यासाठी ४५० कोटींची तरतूद पुरवणी मागणीत केली आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान म्हणून १ हजार कोटींच्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पुणे रिंग रोड आणि जालना-नांदेड महामार्ग प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या कर्जावरील व्याज परतफेडीसाठी भागभांडवली अंशदान म्हणून ५०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी ३ हजार कोटी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीची योजना जाहीर केली होती. त्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीत कर्जमाफी योजनेसाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार पुरवणी मागणीत २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महावितरण कंपनीने घेतलेले कर्ज आणि त्या कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी आठ हजार कोटी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी, तर 'विकसित भारत- जी राम जी' योजनेसाठी ७ हजार ३६७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

पुरवणी मागणीतील महत्वाच्या तरतुदी

- शासकीय कार्यालयांच्या वीजबिलांसाठी ४ हजार कोटी
- अमृत २.० अभियानासाठी ३ हजार ७६ कोटी
- विविध घटकांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी २ हजार ३६० कोटी
- अंगणवाडी सेविका आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी १ हजार ७३४ कोटी
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदानासाठी ७७७ कोटी
- पात्र सहकारी साखर कारखान्यांना सीमांत कजार्साठी ४८३ कोटी
- नागपूर विधानभवन विस्तारासाठी १०० कोटी रुपये

विभागनिहाय निधी

- सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग - २२ हजार १५ कोटी
- नगरविकास - १५ हजार १५२ कोटी
- उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म - १४ हजार ७६० कोटी
- सार्वजनिक बांधकाम विभाग - ५ हजार ३६१ कोटी

सन २०२५-२६ - या वर्षातील पुरवणी मागण्या

- जून २०२५ - ५७ हजार ५०९ कोटी
- डिसेंबर २०२५ - ७५ हजार २८६ कोटी
- फेब्रुवारी २०२६ - ११ हजार ९९५ कोटी

ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह, ठाणे-बोरिवली रस्त्यांसाठी ४५० कोटी

पावसाळ्यापूर्वी आरोग्य विभागाचे नियोजन...

कुत्रा, सर्प दंशावरील उपचारांची तयारी

■वसई। प्रतिनिधी,

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध आरोग्य समस्यांचा सामना करण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. कुत्रा, सर्प किंवा विंचू चावल्याच्या घटनांमध्ये नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी आवश्यक औषधसाठा आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत शहरातील 15 हिंदुहृदयसम्राट आपला दवाखाना, 55 आयुष्यमान मनमंदिर, 7 मोठी दवाखाने, 2 माता-बाल संगोपन केंद्रे तसेच 21 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. या सर्व केंद्रांमध्ये नागरिकांना आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. कुत्रा चावल्यास दिली जाणारी अँटी रॅबीज व्हॅक्सीन तसेच सर्पदंशाच्या प्राथमिक उपचारांसाठी लागणारी औषधे व साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.



याशिवाय, शहरातील पाणी साचणारी व दुगंर्धी पसरणारी ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, अशा भागांमध्ये आशा सेविका आणि एएनएम कर्मचाऱ्यांमार्फत जनजागृती केली जाणार आहे. तसेच साथीचे आजार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक औषधे आणि गोळ्यांचे वाटपही सुरू केला जाणार आहे. पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, अतिसार यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात असून, नागरिकांनीही स्वच्छतेची काळजी घ्यावी आणि कोणतीही आरोग्य समस्या उद्भवल्यास जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. पावसाळ्यातील संभाव्य आरोग्य संकटांचा सामना करण्यासाठी पालिकेची आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

वसई-विरारमध्ये प्रथमच पशुवैद्यकीय रुग्णालय

भटक्या व जखमी प्राण्यांना दिलासा

वसईः वसई-विरार शहरातील भटके, जखमी आणि आजारी प्राण्यांवर उपचार करण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेने प्रथमच पशुवैद्यकीय रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी महानगरपालिकेकडून योग्य जागेचा शोध सुरू करण्यात आला असून, उपलब्ध तयार वास्तूची पाहणी करून तेथे रुग्णालय सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी महानगरपालिकेला सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. प्रस्तावित रुग्णालयात एक पशुवैद्यकीय डॉक्टर आणि एक कंपाउंडर नियुक्त करण्यात येणार असून, भटक्या कुत्र्यांसह इतर प्राण्यांवर उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच स्वतंत्र पशुवैद्यकीय रुग्णालय उभारले जात असल्याने प्राणीप्रेमी संघटना आणि नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. शहरातील मोकाट, जखमी तसेच आजारी प्राण्यांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळण्यास यामुळे मदत होणार आहे. महानगरपालिका प्रशासनाने रुग्णालयासाठी जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, आवश्यक प्रशासकीय मंजुरीनंतर रुग्णालय कार्यान्वित करण्यात येणार आहे. सन 2026-27 या आर्थिक वर्षात हे रुग्णालय भटक्या आणि गरजू प्राण्यांसाठी खुले करण्याचे नियोजन असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शहरातील प्राण्यांच्या आरोग्यसेवेसाठी हे रुग्णालय महत्त्वाचे पाऊल ठरणार असून, भटक्या प्राण्यांच्या उपचारांसह त्यांच्या आरोग्य व्यवस्थापनालाही यामुळे चालना मिळणार आहे.

कोकणात विनाशकारी प्रकल्प नकोच...! मुणगे ग्रामसभेत तीव्र आंदोलनाचा इशारा

गावांमध्ये जनजागृती सुरू

स्थानिकांना विश्वासात न घेता हा प्रकल्प राज्य सरकार लादत असून हा प्रकल्प त्वरित रद्द करावा अन्यथा तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या दृष्टीने देवगड तालुक्यातील सर्व गावांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

■देवगड। प्रतिनिधी,

देवगड तालुक्यातील मुणगे ग्रामस्थांनी नियोजित औष्णिक ऊर्जा आणि अणुऊर्जा या प्रदूषणकारी प्रकल्पांना तीव्र विरोध दर्शवला आहे. मुणगे गावची ग्रामसभा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या गावात ४,००० ते ७,२०० मेगावॉट क्षमतेचा 'एनटीपीसी'चा भव्य अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पासाठी एक लाख कोटींची गुंतवणूक राज्य सरकारने केली आहे.

या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग हे राज्याचे ऊर्जा केंद्र बनणार असले तरी या प्रदूषणकारी प्रकल्पामुळे मुणगे गावाचे



तसेच देवगड तालुका आणि जिल्ह्याचेही फार मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाला स्थानिक रहिवासी आणि कोकणवासीयांनी तीव्र विरोध केला आहे.

नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत मुणगेवासीयांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध केला असून तसा ठरावही घेण्यात आला आहे.

या विनाशकारी प्रकल्पाविरोधात निषेध व्यक्त करण्यासाठी गावामध्ये कोणत्याही राजकीय नेत्यांना येण्यासाठी मनाई करण्यात आली आहे. मुणगेकर ग्रामस्थ आणि मुंबई निवासी, मुणगे रहिवासी यांची एकत्रित ग्रामसभा आयोजित केली होती. त्यात या अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध करून शासनाचा तीव्र निषेध करण्यात आला.

मुणगे गाव आणि आसपासच्या परिसरात जमीन मोजणी आणि आरेखनाचे काम सुरू झाल्याचे आढळून आले असून हा प्रकल्प केवळ मुणगे गावासाठीच नव्हे तर संपूर्ण देवगड तालुका व जिल्ह्याच्या पर्यावरणासाठी अत्यंत घातक आहे.

मुंबईत तथाकथित 4 साधूंना पकडून मारहाण

संशयास्पद हालचाली दिसल्याने तरुणांनी केले पोलिसांच्या स्वाधीन

मुंबईच्या जोगेश्वरी पूर्व परिसरात ही घटना घडली असून दुर्गा नगर परिसरात नागरिकांनी चार जणांना पकडून धुलाई केल्याचा प्रकार उघडकीस आला.



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यात गाजलेल्या पालघर साधू हत्याकांडांमुळे तत्कालीन सरकारला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरत महाविकास आघाडी सरकारला चांगलंच धारेवर धरलं होतं. आता, मुंबईतील जोगेश्वरी परिसरात तथाकथि सांधूंना मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. येथील परिसरातील काही तरुणांनी या तथाकथित साधूंना मारहाण करत, पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. तत्पूर्वी हे साधू गेल्या 4 दिवसांपासून परिसरात संशयास्पद फिरत असल्याचं सांगण्यात येत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात 16 एप्रिल 2020 रोजी महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील गडचिंचले गावात जमावाकडून दोन साधू (महंत कल्पवृक्षगिरी महाराज आणि सुशांतगिरी महाराज) व त्यांचा वाहनचालक निलेश तेलगडे यांची निर्घृण हत्या करण्यात आली. लॉकडाऊन दरम्यान 'मुले पळवणारी टोळी' आल्याच्या अफवांमुळे संतप्त झालेल्या जमावाने ही मॉब लिंचिंग (जमावाने केलेली हत्या) केली होती. आता, मुंबईतील जोगेश्वरी परिसरातही तथाकथित साधूंना मारहाण करण्यात आली. पालघरनंतर मुंबईच्या जोगेश्वरीत कथित भोंदू साधूंना नागरिकांनी चोप दिला. मुंबईच्या जोगेश्वरी पूर्व परिसरात ही घटना घडली असून दुर्गा नगर परिसरात नागरिकांनी चार जणांना पकडून धुलाई केल्याचा प्रकार उघडकीस आला. मागील चार दिवसांपासून अंधेरी-जोगेश्वरी परिसरात या साधूंच्या संशयास्पद हालचाली आढळून आल्याचा आरोप होत आहे. मुलांचे अपहरण करण्यासाठी साधू फिरत असल्याची स्थानिकांची शंका होती, त्यामुळे परिसरात लहान मुले आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. संतप्त नागरिकांनी कथित साधूंना घेराव घालून पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून चौघांनाही चौकशीसाठी पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. साधूंची ओळख आणि परिसरातील हालचालींची पोलिसांकडून पडताळणी सुरू आहे. तसेच, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि संशयास्पद व्यक्ती दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आलं आहे. दरम्यान, एमआयडीसी पोलिसांकडून घटनेचा सखोल तपास सुरू आहे.

११ वर्षीय मुलीचे अपहरण... लैंगिक अत्याचारानंतर हत्या, कॅब चालक जेरबंद!

■नाशिक। प्रतिनिधी,

दिल्लीतील मेहरौली भागात राहणाऱ्या ११ वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कुटुंबीयांसोबत फुटपाथवर झोपलेल्या या चिमुरडीचे पहाटेच्या सुमारास अपहरण करण्यात आले होते. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी तातडीने कारवाई करत सीसीटीव्हीच्या मदतीने अवघ्या ६ तासांत एका नराधम कॅब चालकाला अटक केली आहे. ही घटना सोमवारी (२२ जून) पहाटे घडली. मुलगी अचानक गायब झाल्याचे लक्षात येताच पालकांनी शोध सुरू केला आणि अपहरण झाल्याच्या संशयावरून मेहरौली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.



सीसीटीव्हीमधून आरोपीचा शोध

पीटीआयच्या वृत्तानुसार, तक्रार मिळताच पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तपासादरम्यान एका कॅब चालकाची हालचाल संशयास्पद आढळून आली. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३०-३५ वयोगटातील आणि मूळचा बिहारचा रहिवासी असलेल्या आरोपीने, पहाटे सुमारे पाच वाजता झोपेत असलेल्या मुलीचे अपहरण केले. त्यानंतर पोलिसांनी तिचा शोध घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम हाती घेतली.

२० पथकांची शोधमोहीम

मुलीचा शोध घेण्यासाठी जवळपास २० पोलिस पथके तयार करण्यात आली होती. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि आरोपीच्या हालचालींवर नजर ठेवून पोलिसांनी त्याचा माग काढला. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा केल्यानंतर आरोपी पुन्हा घटनास्थळाच्या परिसरात आला होता. मात्र तेथे पोलिसांची उपस्थिती पाहून तो पळून गेला. त्यानंतर त्याचा पाठलाग करून पोलिसांनी अवघ्या सहा तासांत त्याला अटक केली.

लैंगिक अत्याचारानंतर हत्या

पोलिसांनी सांगितले की, चौकशीदरम्यान आरोपीने मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची कबुली दिली. त्यानंतर तिचा गळा आवळून हत्या केल्याचेही त्याने मान्य केले. गुन्हा लपवण्यासाठी आरोपीने मुलीचा मृतदेह फरीदाबाद-गुरुग्राम मार्गालगतच्या जंगल परिसरात फेकून दिला होता. आरोपीच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सोमवारी रात्री मृतदेह ताब्यात घेतला.

फॉरेन्सिक तपास सुरू

मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, मृत्यूचे नेमके कारण आणि इतर वैद्यकीय पुरावे तपासले जात आहेत. फॉरेन्सिक पथकाने अपहरणस्थळ आणि मृतदेह सापडलेल्या जंगल परिसरात सखोल तपास केला असून, विविध नमुने व पुरावे गोळा करण्यात आले आहेत. पोलिस या प्रकरणात आरोपीने हा निर्घृण गुन्हा एकट्याने केला की त्याचे आणखी साथीदार होते, यासह आरोपीचा पूर्व गुन्हेगारी इतिहास तपासत आहेत.

नवरा कामावर गेला, घरात बायको आणि प्रियकर एकत्रच अन्...

तेलंगणाच्या मेडचल जिल्ह्यातील आई आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आईने प्रियकराला हाताशी धेऊन आपल्याच 2 वर्षाच्या चिमुकल्याची हत्या केली. त्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे भासवून त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. मात्र, 20 दिवसांनंतर या पापाचा पदार्फाश झाला आणि पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. ही भीषण घटना तेलंगणाच्या कीसारा पोलीस ठाणे परिसरात घडली. मूळचे सिद्दिपेट जिल्ह्यातील दगदेवपूर मंडळातील तीगुल रहिवासी असलेले स्वामी आणि ज्योती सध्या मेडचल जिल्ह्यातील कीसारा येथे राहत होते. स्वामी टॅक्सी चालक होते आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा होता.

नवरा कामावर गेला आणि घरात बायको प्रियकरासोबत होती अन्..

पोलिसांच्या माहितीनुसार, ज्योतीचे लग्नापूर्वी यादद्री भुवनगिरी जिल्ह्यातील माधापुर गावातील रहिवासी असलेल्या नवीन नावाच्या तरुणासोबत प्रेम प्रकरण होते. लग्नानंतर ज्योतीने नवीनशी नाते तोडले नव्हते. जेव्हा पती स्वामी हा टॅक्सी घेऊन जायचा तेव्हा नवीन ज्योतीच्या घरी यायचा. 29 मे रोजी देखील असाच प्रकार घडला होता. दोघे घरात एकत्र होते त्यावेळी दोन वर्षांचा मुलगा जोराने रडू लागला होता.

दोन वर्षांच्या मुलगा दोघांच्या नातेसंबंधात अडथळा

मुलाच्या रडण्याने ज्योती आणि प्रियकर नवीनच्या एकांतात व्यत्यय आला. मुलगा दोघांच्या नातेसंबंधात अडथळा ठरत होता, म्हणून दोघांनी चिमुरड्या हरिकृष्णाचे पाय पकडले, नंतर त्याला जमिनीवर आपटून जीवे मारलं. नंतर बेदम मारहाण केली. चिमुरड्याच्या डोक्याला गंभीर जखम झाली आणि रक्त येऊ लागलं, इतक्यातच चिमुरड्याने अखेरच्या श्वास घेतला. खूनानंतर आईने रडण्याचे नाटक केले होते. नंतर त्यांनी नोकरीवरून आलेल्या नवऱ्याला हरिकृष्णाच्या मृत्यूबाबत महिती दिली. पती स्वामीने पत्नीच्या सांगण्यावर विश्वास ठेवला होता. नंतर लहान मुलाचा मृतदेह गावात नेत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, प्रकरण उघडकीस आल्यानंतर स्वामीच्या पायाखालची जमीन सरकून गेली. तो तात्काळ पोलीस ठाण्यात गेला आणि पत्नी आणि तिच्या प्रियकराविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. प्रकरणाचं गांभीर्य पाहून स्वामीने लहान मुलाचा मृतदेह बाहेर काढला, नंतर शवविच्छेदनासाठी पाठवला होता. पोलिसांनी तात्काळपणे कारवाई करत ज्योतीला अटक केली. फरार झालेल्या प्रियकराचा तपास सुरू आहे.



लग्न करण्यास अन् मुलाला पहिल्या नवऱ्याकडे सोडण्यास नकार

लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या मुलाला संपवलं

राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढत चाललं आहे. अशातच पुण्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनं संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

■पुणे। प्रतिनिधी,

लग्न करण्यास नकार देणे आणि तीन वर्षीय मुलाला पहिल्या नवऱ्याकडे सोडण्यास नकार दिल्याच्या रागातून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना रांजणगाव परिसरात घडली. याप्रकरणी रांजणगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (२) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी राणी पप्पू कोल (वय २५, सध्या रा. कारेगाव, कल्याणी कंपनीमागे, मूळ रा. अनुपपूर, मध्य प्रदेश) यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून देवांशु आदित्य साहू (मूळ रा. बरटोला, अनुपपूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती तपास अधिकारी उपनिरीक्षक शिवाजी मुंढे यांनी दिली.

सासरच्या छळाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

मूल होत नसल्याच्या कारणावरून पती व सासूकडून सातत्याने होणारा मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून सिंहगड रस्ता परिसरात २७ वर्षीय आयटी अभियंता तरुणीने राहत्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पती, सासू आणि इतर नातेवाइकांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीप्ती प्रदीप एकशिंगे (वय २७, रा. मणिकबाग, सिंहगड रस्ता) असे मृत तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिचे भाऊ डॉ. किरण तुषार दुधबळे (वय ३०, रा. चामोर्शी, जि. गडचिरोली) यांनी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पती प्रदीप विठ्ठल एकशिंगे, सासू सुरेखा विठ्ठल एकशिंगे तसेच इतर नातेवाइकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्ती मूळची गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी येथील रहिवासी होती. ती आणि प्रदीप एकशिंगे हे दोघेही एका आयटी कंपनीत कार्यरत होते. नोकरीदरम्यान झालेल्या ओळखीचे प्रेमात रूपांतर झाले आणि १७ नोव्हेंबर २०२४ रोजी दोघांनी पुण्यात प्रेमविवाह केला. विवाहानंतर काही काळातच मूल होत नसल्याच्या कारणावरून दीप्तीला पती आणि सासूकडून वारंवार टोमणे मारले जात होते. तिला मानसिक त्रास देण्याबरोबरच मारहाणही केली जात असल्याचा आरोप आहे.

'लिव्ह-इन'मधून चिमुकल्याचा खून

तक्रारदार महिला आणि आरोपी हे मूळचे मध्य प्रदेशातील आहेत. ते नोकरीनिमित्त रांजणगाव परिसरात स्थायिक आहे. त्या दोघांत प्रेमसंबंध होते. गेल्या सहा महिन्यांपासून दोघे कारेगाव येथे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. आरोपीला तक्रारदाराशी लग्न करायचे होते. मात्र, तिने लग्न करण्यास नकार दिला; तसेच आपल्या तीन वर्षीय मुलगा अंशु पप्पू कोल याला नवऱ्याकडे गावी सोडण्यासही नकार दिल्याने आरोपी संतप्त झाला. १७ जून रोजी दुपारी १२.३० ते सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान कल्याणी कंपनीमागील खोली क्रमांक ३७मध्ये ही घटना घडली. तक्रारीनुसार, आरोपी देवांशु साहू याने रागाच्या भरात तीन वर्षीय अंशुवर तोंड, ओठ, डोळे आणि नाकाच्या भागावर कशातरी वस्तूने मारहाण केली. या मारहाणीत चिमुकल्याचा मृत्यू झाला. महिला घरी परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com